# V J T I

## Veermata Jijabai Technological Institute

## वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (Estd.1887)

(Central Technological Institute, Maharashtra State, INDIA)
H. R. Mahajani Marg, Matunga, Mumbai 400019
Tel.No. +91 22 24198101-02 Fax:+91 22 24102874 www.vjti.ac.in


क्र.लेखा/शिवृ/उच्च व तंत्रशिक्षण/परदेश/२२-२३/ ९०८६ /२०२२ दिनांक : १०.०६.२०२२

14 JUN 2022

**परिपत्रक :**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजनेअंतर्गत अर्ज सादर करण्याबाबत**

**संदर्भ : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांचे पत्र क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-३/२०२२/२१३९ दि.०९.०६.२०२२**

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रानुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पी.एच्.डी. अभ्यासक्रमासाठी, THE (The Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आंत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांकरीता वरील शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

अभियांत्रिकी / वास्तुकला शास्त्र अभ्यासक्रमातील पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांकरीता ४ जागा व डॉक्टरेट अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरीता ४ जागा अशा एकूण ८ जागांसाठी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी :**

- उमेदवार व उमेदवाराचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्यावत (सन २०२२ मधील) THE (The Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आंत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे / कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२१-२२ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू.८ लाखापेक्षा जास्त नसावे.
- इच्छुक विद्यार्थ्यांनी https://foreignscholarship२०२२.tde.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर online पद्धतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत, मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालयात वेळापत्रकानुसार सादर करावेत.
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपद्धती इत्यादि माहितीकरीता https://dte.mahatashtra.gov.in या संकेतस्थळावर आवश्यक ते शासन निर्णय उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

तरी, इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी दिनांक १० जून २०२२ ते दिनांक ११ जुलै २०२२ (सायंकाळी ५.०० वा. पर्यंत) पर्यंत संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक ती प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत Upload करून सदरहू अर्ज उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय तंत्रशिक्षण येथे वर नमूद केल्याप्रमाणे online भरलेल्या अर्जाची प्रत, मुळ प्रमाणपत्रे व कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सादर करावेत.

**प्रबंधक**

प्रति, सर्व विभाग प्रमुख - व्यापक प्रसिद्धीकरीता
मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, बांद्रा, मुंबई यांना माहितीस्तव सादर

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE MATUNGA, MUMBAI -19.